# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-८० दिनांक - ०७/०३/२०२४

## घरफोडी करणा-या सराईत आरोपीस अटक - गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांची कामगीरी

-------ooooo-------

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यापासुन घरफोडीच्या गुन्हयात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक ०५/०३/२०२४ रोजी रात्री ०२.३० वाजताच्या दरम्यान ते रात्रौ ०४.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी वय- २६ वर्षे, रा. संतोषभवन, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांचे राहते घरातील लोखंडी दरवाजाची कडीचे बाजुची भिंत फोडुन दरवाजा उघडुन त्यावाटे घरात प्रवेश करुन फिर्यादी याचे राहते घरातुन २०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरफोडी चोरी करुन चोरुन नेले म्हणुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २८५/२०२४ भा.द.वी.स. कलम ३८०,४५७, प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हे अनुषंगाने पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपासादरम्यान घटनास्थळावरील उपलब्ध सि.सि.टी.व्ही. फुटेज मध्ये संशयीत आरोपीत निष्पन्न करुन तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या गोपनीय बातमीवरुन आरोपी नामे जाकीर सिराज शेख, रा. मौर्या चाळ, रुम नंबर १० शेरु खानच्या बंगल्यासमोर श्रीराम नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक ०५/०३/२०२४ रोजी ३०,०००/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असुन त्याचेकडे प्राथमिक तपास करता त्यांचा खालील गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | २८५/२०२४ भा.द.वी.सं कलम ४५७,३८० |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | ११३/२०२४ भा.द.वी.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ३ | वसई पोलीस ठाणे | ३४७/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ प्रमाणे |
| ४ | वसई पोलीस ठाणे | ३५९/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| ५ | वसई पोलीस ठाणे | ३६९/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| ६ | माणिकपुर पोलीस ठाणे | ४०३/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |

नमुद आरोपी यास पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २८५/२०२४ भा.द.वी.सं कलम ४५७,३८० या गुन्हयात हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/प्रमोद बडाख, पोउपनिरी/अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, आतिश पवार, मनोहर तारडे, तुषार दळवी, म.सु.ब/प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.




-----ooo-----